संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# नद्यांचे नाहीसे होणे म्हणजे गावपण हरवणे

पावसाळा संपून तीनच महिने होत आहेत आणि राज्यातल्या नद्या मात्र कोरड्या पडू लागल्या आहेत. यंदा तुलनेने पाऊस बरा पडूनही राज्याच्या निम्म्या भागामध्ये आतापासूनच पाण्याची भीषण टंचाई जाणवू लागली आहे. नवे सरकार आल्यानंतर उत्साहाच्या भरात त्यांनी अनेक घोषणा केल्या. मुंबईत उद्योजकांसाठी मोठमोठ्या परिषदा घेऊन त्यांच्यासाठी सवलती जाहीर केल्या गेल्या, परंतु राज्याच्या ग्रामीण भाग पाण्यासाठी तहानलेला आहे, आणि उन्हाळ्यापूर्वी त्याची पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण करावी, अशा कोणत्याही योजना सरकारच्या डोक्यात दिसत नाहीत.दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाराष्ट्राचा निम्मा भाग पाण्यासाठी तहानलेलाच राहील, यात काही शंका नाही. केवळ मागच्या सरकारवर खापर फोडून नव्या सरकारला जबाबदारी झटकता येणार नाही. महाराष्ट्राचे चित्र जर खऱ्या अर्थाने बदलायचे असेल तर पाण्यासारखी मुलभूत समस्या सोडवण्याचे धैर्य दाखवावे लागेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आतापर्यंत झालेल्या त्याच त्याच उपाययोजना करून हा प्रश्न सुटू शकत नाही हे नव्या सरकारने लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्रातला दरवर्षीचा दुष्काळ हा जितका निसर्ग निर्मित आहे तितका तो मनुष्यनिर्मितही आहे. तसे पाहिले तर महाराष्ट्रामध्ये निसर्गाने पाण्याची मुबलकता दिलेली आहे. फक्त त्याचे नियोजन नसल्यामुळे योग्य तो उपयोग होऊ शकलेला नाही. अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्र इतका सुदैवी आहे की, आज राज्यभरातल्या प्रमुख नद्यांची परिस्थिती जर बघितली तर त्यातून सहजपणे राज्याच्या सत्तर टक्के भागामध्ये पाण्याचा प्रश्न सुटू शकतो.

या नद्यांमुळेच महाराष्ट्राच्या अनेक गावांना तीर्थक्षेत्रांचे स्वरूप प्राप्त झाले. गोदावरी, कृष्णा, भीमा, पंचगंगा, तापी, मुळा, मुठा, प्रवरा यासारख्या थेट विदर्भापर्यंतच्या पाच पंचवीस नद्यांची नावे सहज घेता येतात. परंतु आज या नद्यांच्या शेजारी असलेली सगळी मोठी शहरे पिण्याच्या पाण्याचे संकट झेलत आहेत. ग्रामीण भागामध्ये तर चार चार दिवसांनी नळाला पिण्याचे पाणी येते आणि लोकांना ते साठवून ठेवावे लागते. या नद्यांच्या पाण्याचा सत्तर टक्के वापर हा शेतीसाठी होतो. तरीदेखील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम शिल्लक राहतो, हा एक अजब प्रकार म्हणावा लागेल. दरवर्षी जाणवणारे हे पाण्याचे दुर्भिक्ष्य केवळ पाऊस कमी पडतो या एकमेव कारणाशी निगडीत नाही. तर पावसाळा संपल्यानंतर पुढच्या दोन तीन महिन्यांमध्ये कोरड्या ठणठणीत पडणाऱ्या नद्या हे त्यामागचे सर्वात मोठे कारण आहे.

## दुष्काळाची समस्या

केवळ नद्यांवर धरणे बांधल्यामुळे पुढच्या भागात नद्या कोरड्या पडतात. हे कारणसुध्दा तितकेसे पटणारे नाही. गेल्या काही वर्षात जलसिंचनाकडे सरकारचे दुर्लक्ष झाले. अनेक मोठ्या नद्यांवरची धरणे पूर्ण झाली नाहीत. तर ज्या नद्यांवर घरे बांधली गेली आहेत त्या भागात देखील काहीवेळेला पाण्याची टंचाई निर्माण होते. याचा अर्थ असा झाला की, महाराष्ट्राला नद्यांचे वरदान आहे.परंतु त्या नद्यांच्या नियोजनाचा शाप असल्याने पाण्याचे योग्य ते माप लोकांच्या पदरात पडू शकत नाही. एकेकाळी अगदी उन्हाळ्यातसुध्दा भरपूर पाणीसाठा असणाऱ्या नद्या कोरड्या ठणठणीत पडतात किंवा पावसाळ्यानंतरही पुढचे तीन चार महिने दुथडी भरून वाहणाऱ्या नद्यांमध्ये पाणी शोधण्याची वेळ येते. पावसाळ्यात भरभरून वाहणारी नदी उन्हाळ्यामध्ये ही ती नदी का असे शोधण्याची वेळ येते.आज महाराष्ट्राच्या वाट्याला दरवर्षी येणारा दुष्काळ ते नद्यांच्या नियोजनाकडे झालेल्या दुर्लक्षाचा परिणाम ठरतो. आतापर्यंत जलसंधारणाबाबत मोठमोठ्या घोषणा होत गेल्या. सरकारच्या प्रचारकी थाटावर कोट्यवधी रुपयांची उधळण झाली.

पाणी अडवा पाणी जिरवा एवढेच नव्हे तर पाणी वाचवा यासारख्या मोहिमा राबवल्या गेल्या. पण प्रत्यक्षात हाताशी काहीच लागले नाही. एकेका धरणासाठी पुन्हा पुन्हा निविदा मागवण्याचे प्रकार झाले आणि पैशाची नदी मात्र वाहात राहिली. आज या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर महाराष्ट्राला पाण्याच्या बाबतीत संपन्न करायचे असेल तर नद्या वाचवा आणि गावे जगवा अशी मोहीम सुरू करण्याची वेळ आली आहे. प्रत्येक गावाने आपली नदी वाचवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. ती भर उन्हाळ्यातही वाहती राहील, यासाठी विविध कल्पना राबवल्या पाहिजेत.त्यासाठी सरकारकडे आग्रह धरला पाहिजे. त्या नद्यांवर धरणे किंवा पाटबंधारे किंवा कालवे बांधले गेले असतील तरीसुध्दा बारा महिन्यांपैकी अकरा महिने आपापल्या गावाची शहराची नदी प्रवाहित ठेवण्याची लोकमोहीम सुरू झाली पाहिजे.

## जय नर्मदे, नमामी गंगे

आता ही नदी प्रवाहित कशी ठेवायची यासाठी तज्ज्ञांनी आणि अभ्यासकांनी मार्गदर्शन केले पाहिजे. आपापल्या गावाच्या परिसरात असलेल्या डोंगरदऱ्यांचे पाणी त्या नदीलाच येऊन मिळते. पावसाच्या चार महिन्यांमध्ये प्रचंड पाणी अक्षरशः वाया जाते. ते वाहून जाते. पावसाळ्यामध्येच हे पाणी ठिकठिकाणी अडवण्याच्या योजना झाल्या पाहिजेत. आणि त्यातलेच थोडे थोडे पाणी नदीमध्ये सोडवण्याची कल्पना राबवली गेली तर नदी अखंडपणे प्रवाहित राहू शकेल. आपल्या संस्कृतीमध्ये नदीला फार महत्त्व दिले गेले आहे. नदी म्हणजे गावाच्या सौभाग्याचे लक्षण मानले गेले आहे. ज्या गावाला नदी असते ते गाव संपन्न आणि समृध्द असते. मातेसमान मानल्या गेलेल्या या नदीला सांभाळून ठेवण्याची जबाबदारी सरकार आणि समाज या दोघांचीही आहे. नदीचे नाहिसे होणे किंवा हरवणे म्हणजे त्या गावाला बकालपण प्राप्त होण्यासारखे असते.

महाराष्ट्रातील चाळीस टक्के नद्या या भर उन्हाळ्यामध्येसुध्दा वाहत्या ठेवल्या जाऊ शकतात. यासाठी थोडे आधुनिक तंत्रज्ञान वापरावे लागेल. दरवर्षी निर्माण होणारी पाण्याची समस्या सोडवायची असेल तर तितक्याच नव्या कल्पना आणि योजना पुढे आल्या पाहिजेत. नदीचे नाहिसे होणे म्हणजे त्या गावाचे आणि शहराचे शहरपण हरवण्यासारखे असते. भारतात सर्वात मोठ्या मानल्या गेलेल्या गंगा, यमुना, कावेरी, नर्मदा या नद्यांसाठी विशेष योजना राबवल्या गेल्या. आतादेखील नरेंद्र मोदी यांनी नमामी गंगे यासारखी मोहीम राबवली गेली आहे. गुजरातमध्ये जय नर्मदे वरदे, अशी घोषणा देऊन गुजरातचा मोठा परिसर दुष्काळग्रस्त केला गेला आहे. महाराष्ट्रासाठी अशा मोहिमा अवघड नाहीत.